पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे

औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शहादा, जि.नंदुरबार

# विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव

आयोजन कालावधी दि. १९ ते २३ एप्रिल २०२२

**चहा, नाश्ता व भोजनाच्या करारपध्दतीसाठी निविदा**

भाग ०१ ते ०४

पेजेस - ०१ ते ०८

निविदाधारकाचे नाव :

पुर्ण पत्ता :

दूरध्वनी क्रमांक :

निविदा स्विकरण्याची अंतिम दिनांक 12/04/2022

वेळ सायंकाळी ५ वाजेपर्यंत

किंमतः रु.२५०/-

पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे

**औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय**, शहादा, जि.नंदुरबार

विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव

**आयोजन कालावधी दि. १९ ते २३ एप्रिल २०२२**

# चहा, नाश्ता व भोजनाच्या करारपध्दतीसाठी निविदा

भाग -१

## निविदा धारकाची माहिती

१) संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता :

२) दूरध्वनी व फॉक्स क्रमांक :

३) मालकाचे / भागीदाराचे नाव :

४) व्यव्सायातील अनुभव :

५) शॉप ॲक्ट रजिस्टेशन क्रमांक :

(सांक्षांकित प्रत जोडावी )

६) व्हॅट /सर्व्हिस टॅक्स रजिस्टेशन क्रमांक:

७) पॅन क्रमांक :

(सांक्षांकित प्रत जोडावी )

८) परवाना :

९) आपल्याकडे उपलब्ध असलेली यंत्र सामग्री (मशिनरी ):

मनुष्यबळ व इतर साधनांचा तपशील

१०) निविदा किंमत व बयाना रकमेचे धनाकर्ष क्रमांक व तारीख:

(जादाची माहिती देण्यासठी सहपत्र जोडावे )

निविदाधारकाचे नाव /सही व शिक्का

# पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे

## औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शहादा, जि.नंदुरबार

# विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव

### आयोजन कालावधी दि. १९ ते २३ एप्रिल २०२२

# चहा, नाश्ता व भोजनाच्या करारपध्दतीसाठी निविदा

## भाग -२

## निविदा अटी / शर्ती

पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे **औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय**, शहादा जि. नंदुरबार येथे १९ ते २३ एप्रिल २०२२ दरम्यान विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. सदर कार्यकमासाठी जवळपास २५०० व्यक्ती (विद्यार्थी /विद्यार्थिनी, संघ व्यवस्थापक, संगीत, साथीदार, विदयापीठ विभाग व विदयापीठ विद्यार्थी परिषद पदाधिकारी व सदस्य आणि महाविद्यालय विविध समिती सदस्य ई. सह) उपस्थित राहणार आहेत. तसेच या महोत्सवासाठी उपस्थित राहणाऱ्या मान्येवर, महोत्सवात भाग घेणाऱ्या स्पर्धान्कांसाठी **चहा, नाश्ता व भोजनाची व्यवस्था** पुरवावयाचे आहे, म्हणून युवक महोत्सव समितीने घेतलेल्या निर्णयानुसार प्रतिथयश व नोंदणीकृत पुरवठादार यांचेशी महोत्साव्पुर्वी दर करार करणेबाबत निश्चित केलेल्या साईज व प्रकार तसेच निविदेत नमूद खालील निर्देशित अटी व शर्तीनुसार निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सीलबंद पाकिटातून दि. 12/04/2022 रोजी **सायंकाळी ५ वाजेपर्यंत** महाविद्यालयाचा कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस सोडून जमा करावेत.

१) निविदा किंमत रू.२५०/ (अक्षरी रू.दोनशे पन्नास मात्र ) (नापरातावा ) करिता , मा.प्राचार्य **औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय** यांच्या नावाचा राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाद्वारे निविदा जमा करतेवेळी जमा करावा लागेल व बयाणा रक्कम रु.५०००/- (अक्षरी पाच हजार मात्र ) करिता , मा.प्राचार्य यांच्या नावाचा राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाद्वारे निविदा सोबत जोडणे आवश्यक आहे .ह्या संदर्भातील कोरी निविदा ( Blank Tender Form) आपण डाऊनलोड करून घ्यावयाची आहे.

२) संपूर्ण निविदा दोन भागात तांत्रिक निविदा ( Technical Bid) व दरांची निविदा (Price Bid) मध्ये विभागलेली असून तांत्रिक निविदे अंतर्गत भाग -१ ते ३ समाविष्ट आहेत. भाग-४ मध्ये ( Price Bid) भाग-१ ते ३ एका स्वतंत्र पाकीटात व भाग-४ वेगळ्या पाकीटात टाकून दोन्ही पाकिटे एका सिलबंद पाकीटात जमा करावेत. सिलबंद निविदा पाकीटावर **चहा, नाश्ता व भोजनाचे** दर कराराची नीविदा असे स्पष्ट नमूद करावे.

३) कोणत्याही कारणास्तव विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

४) **चहा, नाश्ता व भोजनाची व्यवस्था** साठी मान्य झालेले दर हे युवक महोस्तव आयोजन कालावधीसाठी बंधनकारक राहतील .

५) नियमानुसार विविध करांची रक्कम बिलातून परस्पर वसूल करण्याचा अधिकार महाविध्यालयास राहील.

६) **चहा, नाश्ता व भोजनाची व्यवस्था** साठी दर करार झाल्यानंतर पुरवठा करण्यास पुरवठाधारकाने नकार दिल्यास तसेच महाविध्याल्याने करार संपुष्टात आणण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे , अशा स्थितीत सदर निविदाधाराकाची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. अशा व्यवहारात कार्यक्रम आयोजकांना नुकसान झाल्यास सदर तुट पुरवठाधारकाकडून वसूल केली जाईल .

७ ) सशर्त (Conditional) निविदा स्वीकारली जाणार नाही .

८ ) कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारण्याच्या, फेटाळण्याचा, अटीत संपूर्ण किंवा अशत: बदल करण्याचे किंवा करार संपुष्टात आणण्याचा संपूर्ण अधिकार महाविध्यालयाने राखून ठेवलेला आहे.

९) संभाव्य वाद विवाद शहादा न्यायालय कक्षे अंतर्गत विचाराधीन राहतील .

१०) निविदेत दर नमूद करतांना सर्व करांसहित (GST) नमूद करावा .

११) पुरवठादारास कोणताही अग्रीम (Advance) दिला जाणार नाही व काम समाधानकारकरीत्या पुर्ण झाल्यावर देयक सादर केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत देयकाची रक्कम अदा करण्यात येईल .

१२) कार्यक्रम आयोजक प्रमुखांनी अहवाल दिल्यानंतर बील अदायागी होईल .

१३) पुरवठाधारकास महाविद्यालयाद्वारे **चहा, नाश्ता व भोजनाची व्यवस्था** बाबतचे दर निश्चित केल्यानंतर दोन दिवसांच्या आत रु.५,००० /- अनामत रक्कम (सुरक्षा ठेव) भरावी लागेल . सदर रक्कम करार संपुष्टात

आल्यानंतर केली जाईल . तथापि , दर कराराच्या कालावधीत पुरवठाधारकाने दर करारातील अटी व शर्तीचा भंग केल्यास सदरची सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल . तसेच दर करार रद्द करण्यात येईल .

१४) दरपत्रकातील दर हे सर्व खर्च / कर समावेशक असावेत म्हणजे महाविद्यालयाच्या कार्यक्रम स्थळापर्यंत मागणीनुसार उपलब्ध असणारे व कोणताही छुपा खर्च विरहीत असावेत .

१५) महाविद्यालयाचा कार्यक्रमस्थळी वापरावयाच्या संपूर्ण साहित्याची सूरक्ष सुरक्षिततेची / रक्षणाची साहित्य आणल्या पासून ते परत नेईपर्यंतची संपूर्ण जवाबदारी ही संबधित निविदाधारकाचीच राहील.

१६) पुरवठाधारकास आवश्यक ते साहित्य / वस्तू ने-आण करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे भाडे /वाहतुकीचा खर्च /मंजुराचां खर्च वेगळा देण्यास येणार नाही.

१७) बील सादर करताना बीलावर Services Tax No./CST/BST No. (पक्की बीले ) असणे आवश्यक आहे.

१८) प्रत्येक पानावर पुरवठादार यांनी नाव,सही ,शिक्का ,करणे आवश्यक आहे.

१९) निविदा अहस्तांतरणीय आहे. करिता आऊट सोसिग / सब कॉंट्रॅक्टीग करता येणार नाही.

२०) सर्व्हिस टॅक्स : महाविध्यालयास इन्कम टॅक्स अन्वये सर्व्हिस टॅक्स सूट ( Exemption) असल्याने दर भरतांना सर्व्हिस टॅक्स लावू नये .

२१) निविदेतील सर्व अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असुन त्यांचे काटेकोरपणे पालन करण्याचा अधीन राहून सदरची निविदा सादर करीत आहे .

**२२) युवक महोत्सवसाठी भोजनासाठी एका वेळेस किमाण २२०० व्यक्ती करीता (आवश्यकते प्रमाणे), तसेच चहा व नाश्ता किमाण ३०० व्यक्ति करीता (आवश्यकते प्रमाणे) निविदा मागविण्यात येत आहे.**

**२३) युवक महोत्सवसाठी ज्या दिवसापासून चहा, नाश्ता व भोजन ठेका मंजुर होईपर्यंत किंवा निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत प्रशासकीय गरजे प्रमाणे भोजन पुरवठा करावा लागेल.**

**२४) ठेकेदाराने त्याच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तसेच ठेका बाबत संपुर्ण कामगार कायदे, स्थायी आदेशांचे वेळोवेळी पालन करणे बंधनकारक राहील. त्याबाबतचे कागदपत्रे त्यांनी मा. प्राचार्य यांना दाखविणे आवश्यक राहील.**

**२५) कार्यक्रमामध्ये चहा, नाश्ता किंवा जेवण करीत असतांना जर ताटामध्ये काही अनपेक्षीतपणे किडे, अळी, झुरळ इत्यादी निघाले आणि त्याबाबची तक्रार संबंधितांनी केली तर याबाबत चौकशी केल्यानंतर त्वरीत मा. प्राचार्य यांना अहवाल सादर करावा. नंतर मा. प्राचार्य हे चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करतील गरज भासल्यास महाराष्ट्र शासनाचे, अन्न व औषध विभागातील अधिकारी यांचेशी संपर्क करुन त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.**

**२६) वरील पैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास त्या संदर्भात ठेकेदाराचे म्हणणे ऐकुण घेवून सदर ठेका रद्द करण्याचा सर्व अधिकार मा. प्राचार्य यांना राहतील.**

**२७) ठेकेदाराने वेळेवर चहा, नाश्ता व भोजनाचा पुरवठा न केल्यास अशा प्रसांगासाठी ठेकेदारास रुपये १०००/- प्रति दिवस दंड आकरण्यात येईल. तसेच चहा,नाश्ता व भोजनाची पर्यायी व्यवस्था केल्यास त्यासाठी मंजुर दरापेक्षा लागणारा जादा खर्च ठेकेदारांकडून वसुल करण्यात येईल.**

**२८) निविदाधारकास चहा, नाश्ता व भोजन ठेका मंजुर झाल्यास त्यांनी चांगल्या प्रतिचे चहा, नाश्ता व भोजन देणे बंधनकारक राहील. परंतु चहा, नाश्ता व भोजनातुन विषबाधा सारखे काही प्रकार घडल्यास त्यांच्या विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, व त्यांची जबाबदारी पुरवठाधरकांची राहील.**

**२९) महाविद्यालयाचे हित लक्षात घेऊन सदर निविदतील एखादी किंवा अधिक अटी शिथिल करण्याचा व अर्थ लावण्याचा तसेच कोणतीही निविदा पुर्णतः अथवा अशंतः मंजुर करण्याचा तसेच एखादी अगर सर्व निविदा कोणतीही कारण न दर्शविता नाकारण्याचा संपुर्ण अधिकार महाविद्यालयाने राखून ठेवला आहे.**

**३०) कोणत्याही परिस्थितीत मंजुर दरामध्ये वाढ केली जाणार नाही. तसेच निविदेच्या दराबाबत आवश्यकता वाटल्यास वाटाघाटी करण्याचा अधिकार संनियंत्रण समितीस राहिल.**

**३१) कार्यक्रमासाठी वापरण्यात येणाऱ्या गॅस यंत्रणेच्या सुरक्षितेची संपुर्ण जबाबदारी ठेकेदारची राहील. तसेच स्वयंपाकाच्या ठिकाणी दुर्घटना घडल्यास होणाऱ्या संभाव्य नुकसानाची जबाबदारी सुध्दा ठेकेदाराची राहील.**

३२) ठेकेदारास उपरोक्त कामासाठी अथवा साहित्यापोटी अग्रीम रक्कम दिली जाणार नाही.

३३) ठेकेदारने चहा, नाश्ता व भोजनासाठी आवश्यक सर्व वस्तु उच्च प्रतीच्या दर्जाच्या खरेदी कराव्यात. तसेच नाश्ता व भोजनासाठी शुध्द सोयाबीन तेल वापरावे.

३४) ठेकेदाराने पुरविलेले खाद्यपदार्थ भेसळयुक्त असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत ठेकेदार भेसळ प्रतिबंधक कायद्यामधील तरतूदीनुसार कारवाईस पात्र राहील.

३५) ठेकेदारने चहा, नाश्ता व भोजनासाठी लागणारे पिण्याचे शुध्द पाणी (मिनरल वॉटर) ची व्यवस्था करावी लागेल.

३६) ठेकेदाराला चहा, नाश्ता व भोजनासाठी लागणारे टेबल व स्वंयपाकासाठी, जेवणासाठी लागणारे साहीत्य (डिश, ग्लास, वाट्या, ताट इत्यादी) ची व्यवस्था करावी लागेल.

३७) ठेकेदाराला भोजन वाढण्यासाठी लागणारे कामगार (वेटर व साहीत्य धुण्यासाठी माणसे) व्यवस्था करावी लागेल.

निविदेतील सर्व अटी मान्य असल्याबाबत

निविदाधारकाचे नाव /सही व शिक्का

दिनांक :    /०४/२०२२

पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे

औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शहादा, जि.नंदुरबार

# विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव

आयोजन कालावधी दि.१९ ते २३ एप्रिल २०२२

## चहा, नाश्ता व भोजनाच्या करारपध्दतीसाठी निविदा

### निविदा भाग - ३

युवकमहोत्सव कार्यक्रमासाठी दि.१९ ते २३ एप्रिल २०२२ पर्यंत सकाळी व सध्यांकाळी चहा, नाश्ता व भोजनासाठी खालील प्रमाणे निविदा द्यावी.

नाश्ता : दररोज सकाळी ०८.०० वाजता किमाण २५० व्यक्तिसाठी पुरवठा करावा. (पोहे, उपमा, आलुवडे, कचोरी)

चहा : दररोज सकाळी ०८.०० वाजता व दुपारी ०३.०० वा. किमाण २५० व्यक्तिसाठी पुरवठा करावा.

जेवण : सकाळी किमाण २२०० व्यक्ति करीता व सध्यांकाळी किमाण २००० व्यक्ति करीता जेवणासाठी खालील प्रमाणे व्यवस्था करावी.

| वेळ | १९.०४.२०२२ | २०.०४.२०२२ | २१.०४.२०२२ | २२.०४.२०२२ | २३.०४.२०२२ |
|---|---|---|---|---|---|
| दुपारी : १०.३० ते १.३० | वरण-भात | वरण-भात | वरण-भात | वरण-भात | वरण-भात |
| | ०२ भाज्या | ०२ भाज्या | ०२ भाज्या | ०२ भाज्या | ०२ भाज्या |
| | पुरी / पोळी | पुरी / पोळी | पुरी / पोळी | पुरी / पोळी | पुरी / पोळी |
| | एक मिठाई | एक मिठाई | एक मिठाई | एक मिठाई | एक मिठाई |
| | स्विट | स्विट | स्विट | स्विट | स्विट |
| | लिंबू | लिंबू | लिंबू | लिंबू | लिंबू |
| | लोणचे | लोणचे | लोणचे | लोणचे | लोणचे |
| | | | | | |
| संध्याकाळी ६.०० ते ८.०० | १९.०४.२०२२ | २०.०४.२०२२ | २१.०४.२०२२ | २२.०४.२०२२ | २३.०४.२०२२ |
| | वरण-भात/ खिचडी | वरण-भात/ खिचडी | वरण-भात/ खिचडी | वरण-भात/ खिचडी | -- |
| | ०२ भाज्या | ०२ भाज्या | ०२ भाज्या | ०२ भाज्या | -- |
| | पुरी / पोळी | पुरी / पोळी | पुरी / पोळी | पुरी / पोळी | -- |
| | लिंबू | लिंबू | लिंबू | लिंबू | -- |
| | लोणचे | लोणचे | लोणचे | लोणचे | -- |

वरील अटी मान्य असल्याबाबत

ठेकेदाराचे नाव, सही व शिक्का

दि. /०४/२०२२

पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे

औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शहादा, जि.नंदुरबार

# विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव

# चहा, नाश्ता व भोजनाच्या करारपध्दतीसाठी निविदा

**आयोजन कालावधी दि. १९ ते २३ एप्रिल २०२२**

भाग - ४ (Price Bid)

**प्रति,**

**मा. प्राचार्य,**

**पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे**

**औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,**

**शहादा, जि. नंदुरबार.**

**विषय: विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव करिता..**

**संदर्भ: आपली दि. /०४/२०२२ रोजी ............................ या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली जाहिरात.**

**महोदय,**

**आपल्या दि. /०४/२०२२ रोजी ............................ या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या निविदा सूचनेनुसार व निविदेतील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून आम्ही दर सादर करीत आहोत. युवकमहोत्सव कार्यक्रमासाठी दि. १९ एप्रिल ते २३ एप्रिल २०२२ पर्यंत सकाळी व सध्यांकाळी चहा, नाश्ता व भोजनासाठी खालील प्रमाणे निविदेचे दर देत आहे.**

**नाश्ता : दर पुढील प्रमाणे - (दररोज एक वेळ २५० व्यक्ति करीता) :- .........................**

**चहा : दर पुढील प्रमाणे - (दररोज दोन वेळा २५० व्यक्ति करीता) :- .........................**

**जेवण : दर पुढील प्रमाणे - सकाळी किमाण २२०० व्यक्ति करीता व सध्यांकाळी किमाण २००० व्यक्ति करीता जेवणासाठी खालील प्रमाणे व्यवस्था करावी.**

**१) दर सकाळ साठी प्रति व्यक्ति ............................**

**२) दर संध्याकाळ साठी प्रति व्यक्ति ...........................**

| वेळ | १९.०४.२०२२ | २०.०४.२०२२ | २१.०४.२०२२ | २२.०४.२०२२ | २३.०४.२०२२ |
|---|---|---|---|---|---|
| दुपारी : १०.३० ते १.३० | वरण-भात | वरण-भात | वरण-भात | वरण-भात | वरण-भात |
| | ०२ भाज्या | ०२ भाज्या | ०२ भाज्या | ०२ भाज्या | ०२ भाज्या |
| | पुरी / पोळी | पुरी / पोळी | पुरी / पोळी | पुरी / पोळी | पुरी / पोळी |
| | एक मिठाई | एक मिठाई | एक मिठाई | एक मिठाई | एक मिठाई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | स्विट | स्विट | स्विट | स्विट | स्विट |
| | लिंबू | लिंबू | लिंबू | लिंबू | लिंबू |
| | लोणचे | लोणचे | लोणचे | लोणचे | लोणचे |
| | | | | | |
| संध्याकाळी ६.०० ते ८.०० | १९.०४.२०२२ | २०.०४.२०२२ | २१.०४.२०२२ | २२.०४.२०२२ | २३.०४.२०२२ |
| | वरण-भात/ खिचडी | वरण-भात/ खिचडी | वरण-भात/ खिचडी | वरण-भात/ खिचडी | -- |
| | ०२ भाज्या | ०२ भाज्या | ०२ भाज्या | ०२ भाज्या | -- |
| | पुरी / पोळी | पुरी / पोळी | पुरी / पोळी | पुरी / पोळी | -- |
| | लिंबू | लिंबू | लिंबू | लिंबू | -- |
| | लोणचे | लोणचे | लोणचे | लोणचे | -- |

उपरोक्त मेणू प्रमाणे चहा, नाश्ता व भोजन व त्यात समाविष्ठ केलेले पदार्थ न दिल्याचे आढळल्यास संबंधीत ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची मला कल्पना आहे. मी वरील प्रमाणे अटी व शर्ती काळजी पुर्वक वाचल्या असुन त्या मला मान्य आहेत अशी हमी देतो.

निविदाधारकाचे पूर्ण नावः

सही शिक्का